

# भूगोल, लेख-८

**सदाशिव पाटील, शाळा :** बालमोहन विद्यामंदिर, दादर

पाठ ११. (अ) वाहतुकीचे मार्ग (ब) संदेशवहन आणि व्यापार.

विद्यार्थी मित्रांनो,

वाहतुकीचे मार्ग म्हणजे देशाच्या रक्तवाहिन्या! कोणत्याही राष्ट्राची गतीमानता वाहतूक आणि संदेशवहन यांवर अवलंबून असते. वाहतूक प्रणालीत रस्ते, लोहमार्ग, जलमार्ग, वायुमार्ग इत्यादींचा समावेश होतो. वाहतुकीच्या मार्गांमुळे विविध देशातील लोक आपल्या संपर्कात येतात. आचारविचारांची देवाण-घेवाण होते. तसेच आधुनिक संदेशवहन साधनांमुळे देशातील तसेच जगातील कोणत्याही ठिकाणी अल्पावधीत संपर्क साधणे शक्य झाले आहे. आधुनिक संदेशवहनाद्वारे लिखित, संभाषित तसेच दृश्यरूपातील विचारांची देवाणघेवाण होते. आता कृत्रिम उपग्रहांद्वारे संदेशवहन होऊ लागल्याने या क्षेत्रात क्रांती झाली आहे.

**रस्ते :-** भारतातील एकूण वाहतुकीच्या मार्गांच्या लांबीपैकी ८५ टक्के लांबी रस्त्यांची आहे. देशात ३३ लाख किमीपेक्षा अधिक लांबीचे रस्ते आहेत. रस्त्यांचे कार्यात्मक तीन गट पुढीलप्रमाणे.१) राष्ट्रीय महामार्ग व द्रुतगती मार्ग २) राज्य महामार्ग व जिल्हा प्रमुख मार्ग ३) ग्रामीण रस्ते

**लोहमार्ग :-** राष्ट्रातील प्रवासी व माल वाहतुकीसाठी महत्त्वाचे. देशाच्या आर्थिक विकासास व कृषी विकासास लोहमार्गांमुळे गती मिळाली आहे. भारतात सन १८५३ मध्ये मुंबई ते ठाणे हा पहिला लोहमार्ग सुरू झाला. त्यावेळी या लोहमार्गाची लांबी ३४ किमी होती. आता देसात सुमारे ६३,५०० किमी. लांबीचे लोहमार्ग असून सुमारे ७००० स्थानकांना ते जोडतात.

लोहमार्ग वाहतुकीत सुसूत्रता भावी म्हणून भारतीय रेल्वेचे १६ विभाग केलेले आहेत. तसेच कोकण रेल्वे हा विशेष विभाग आहे. रोहा ते मंगळूरपर्यंतचा हा लोहमार्ग ७६० किमी लांबीचा आहे. गेल्या काही वर्षांत लोहमार्गांचे विद्युतीकरण वेगाने वाढले आहे.

**नळमार्ग :-** हा वाहतुकीचा आधुनिक प्रकार आहे. खनिज तेल, डिझेल, पेट्रोल, नैसर्गिक वायू इत्यादी वाहून नेण्यासाठी नळमार्ग वापरतात. भारतात पहिला नळमार्ग १९६२ ते १९६८ या कालावधीत आसाममधील नाहरकटिया तेल क्षेत्रातून बरौनीपर्यंत सुरू झाला. सध्या देशात सुमारे ७००० किमीपेक्षा अधिक लांबीचे नळमार्ग आहेत.

**जलमार्ग :-** आंतरराष्ट्रीय व्यापारात जलमार्ग महत्त्वाचे असतात. आधुनिक जहाजे अनेक सोयी-सुविधांनी युक्त असतात. त्यामुळे कमी खर्चात दूरपर्यंत नाशवंत मालाची जलमार्गाने वाहतूक केली जाते.

नद्या, कालवे, सरोवरे यांद्वारे प्रवाशांची व मालाची ने-आण केली जाते याला 'देशांतर्गत जलवाहतूक म्हणतात. देशात गंगा, कृष्णा, गोदावरी, महानदी, मांडवी यासारख्या नद्या जलवाहतुकीस उपयुक्त आहेत.

भारताला ७५१७ किमी लांबीचा किनारा लाभला आहे. संपूर्ण किनारी प्रदेशात १२ प्रमुख बंदरे व १८६ लहान बंदरे आहेत. भारताचा ९५ टक्के विदेशी व्यापार या बंदरांमधून केला जातो.

**वायुमार्ग :-** भारताच्या विशाल भौगोलिक विस्तारामुळे तसेच जागतिकीकरणामुळे जगातील निरनिराळ्या राष्ट्रांशी संपर्क साधता यावा म्हणून वायुमार्गाची सेवा विकसित केली आहे.

भारतातील वायुमार्गाचे व्यवस्थापन व नियमन शासकीय स्वायत्त संस्था करतात. देशांतर्गत वायुमार्गाचे व्यवस्थापन 'इंडियन एअरलाईन्स' ही संस्था करते. 'एअर इंडिया' ही संस्था आंतरराष्ट्रीय प्रवासी व माल वाहतूक करते. 'पवनहंस' या शासकीय संस्थेमार्फत भारतात हेलिकॉप्टर सेवा उपलब्ध केली गेली आहे.

देशात दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, कोची, बंगळूर, हैद्राबाद, पटना, अहमदाबाद, श्रीनगर इत्यादी ठिकाणी आंतरराष्ट्रीय विमानतळ आहेत.

**संदेशवहन :-** (व्यक्तिगत व सार्वजनिक) माहिती आणि संदेशाची देवाण-घेवाण म्हणजे 'संदेशवहन' होय. आधुनिक संदेशवहनाद्वारे लिखित, संभाषित तसेच दृश्यरुपातील विचारांची देवाण-घेवाण होते. आता कृत्रिम उपग्रहांद्वारे संदेशवहन होऊ लागल्याने या क्षेत्रात क्रांती झाली आहे.

टपाल व तार सेवा, स्पीड पोस्ट, दूरध्वनी, भ्रमणध्वनी यंत्र, इत्यादी व्यक्तिगत संदेशवहनाची साधने तर आकाशवाणी, दूरचित्रवाणी, वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तके आणि चित्रपट ही सार्वजनिक संदेशवहनाची प्रमुख साधने आहेत.

**व्यापार :** 'व्यापार' या संज्ञेचा अर्थ खूपच व्यापक झाला आहे. वस्तू, सेवा, कौशल्य, विचार, संशोधन यांची देवघेव म्हणजे व्यापार होय. व्यापार हे आर्थिक विकासाचे एक परिमाण आहे.

स्थानिक व्यापार, आंतरराज्यीय व्यापार, आंतरराष्ट्रीय व्यापार हे व्यापाराचे प्रमुख प्रकार आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापारात आयात व्यापार व निर्यात व्यापार या महत्त्वाच्या बाबी आहेत.

जगातील देशांनी एकमेकांशी व्यापार करताना काही तत्त्वे व नियम पाळावेत, जागतिक व्यापार संबंध सलोख्याचे राहावेत म्हणून 'संयुक्त राष्ट्रांनी' एक करारनामा तयार केला. त्यानुसार आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियमन करण्यासाठी, वाद-तंटे- समस्या सोडविण्यासाठी 'जागतिक व्यापार संघटना' स्थापन केली आहे.

**प्रश्न- कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य ते पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) भारताच्या एकूण आयातीत सर्वाधिक वाटा... देशांचा आहे.
(आशियाई, युरोपीय, आफ्रिकी, मध्यपूर्व)

२) राष्ट्रीय महामार्गांचे व्यवस्थापन... करते.
(स्थानिक प्रशासन, राज्य शासन, केंद्र शासन, जिल्हा परिषद)

३) भारत संचार निगम लिमिटेड... क्षेत्रातील कंपनी आहे.
(शासकीय, खासगी, सार्वजनिक, निमशासकीय)

४) तेल व नैसर्गिक वायू महामंडळाला... ही संस्था हेलिकॉप्टर सेवा पुरवते.
(पवनहंस, एअर इंडिया, इंडियन एअर लाइन्स, वायुदूत.)

**उत्तर-** १) युरोपीय २) केंद्र शासन ३) निमशासकीय ४) पवनहंस.

**प्रश्न - पुढील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा-**

**१)** आंतरराज्यीय व्यापार म्हणजे काय?

**उत्तर-** एकाच देशातील निरनिराळ्या राज्यांच्या दरम्यान होणाऱ्या व्यापारास आंतरराज्यीय व्यापार म्हणतात.

**२)** नळमार्गाद्वारे कोणत्या मालाची वाहतूक केली जाते ?

**उत्तर-** खनिजतेल, डिझेल, पेट्रोल, नैसर्गिक वायू इत्यादींची वाहतूक नळमार्गाने केली जाते.

**३)** कोकण रेल्वे प्रकल्प कोणाकोणाच्या सहभागातून अस्तित्वात आला?

**उत्तर-** महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ ही चार राज्ये आणि रेल्वे मंत्रालय यांच्या सहभागातून कोकण रेल्वे प्रकल्प अस्तित्वात आला.

**प्रश्न- पुढील विधानांची कारणे लिहा-**

**१)** उपग्रहांमुळे संदेशवहनात क्रांती झाली आहे.

**उत्तर-**१) तांत्रिक विकासामुळे सध्या उपग्रहीय संदेशवहन हे सर्वात महत्त्वाचे साधन आहे २) आकाशवाणी, दूरदर्शन याद्वारे देशातील व परदेशातील घटना ऐकता व पाहता येतात ३) एस.टी.डी., आय.एस.डी. व इंटरनेट, संदेशवहन सेवा उपग्रहांच्या सहाय्याने विकसित झाली ४) कृत्रिम उपग्रहांच्या फोनद्वारे जगात कोठेही अत्यल्प अवधीत संदेशवहन करणे व संपर्क साधणे शक्य झाले आहे म्हणून उपग्रहांमुळे संदेशवहनात क्रांती झाली आहे.

**२)** भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील अनेक बंदरे नैसर्गिक आहेत.

**उत्तर-**१)पश्चिम किनाऱ्यावर अनेक खाड्या व उपसागर असल्याने खुल्या समुद्रातील वादळी वाऱ्यांपासून व मोठ्या लाटांपासून बंदरांना संरक्षण मिळते२) या भागात किनाऱ्याजवळ पाणी खोल असते, त्यामुळे मोठ्या नावा, जहाजे, किनाऱ्यापर्यंत येऊ शकतात २) कांडला, मुंबई, न्हावा-शेवा, मार्मागोवा, कोची इत्यादी पश्चिम किनाऱ्यावरील महत्त्वाच्या बंदरांना नैसर्गिक पार्श्वभूमी लाभली आहे.

**सरावासाठी प्रश्न**

**प्रश्न - टिपा लिहा-**

१) वायुमार्गाचे महत्त्व, २) आंतरराष्ट्रीय व्यापार,३) देशांतर्गत जलमार्ग

**प्रश्न- सविस्तर उत्तरे लिहा-**

१) रस्त्यांचे प्रमुख प्रकार सांगून ग्रामीण रस्त्यांबद्दल माहिती लिहा-

२) सार्वजनिक संदेशवहनाची प्रमुख साधने कोणती ते सांगून 'दूरचित्रवाणी'बद्दल माहिती लिहा-

**प्रश्न-भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील घटक दाखवा,तसेच नावे द्या.**

चिन्हांची सूची द्या.

१) चेन्नई ते कोलकाता जलमार्ग,२) मुंबई ते मंगळूर राष्ट्रीय महामार्ग
३) मुंबई ते दिल्ली वायूमार्ग,४) विशाखापट्टणम् बंदर,५) कोची बंदर.

**उद्याचा विषय : इतिहास**